# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

**विषय - सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क / ई-सुविधा शुल्क / विद्यार्थी नोंदणी शुल्क भरणेबाबत तसेच सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधील विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय/तुकडी बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत.**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांनी त्यांच्या महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये विद्यापीठ मान्यता असलेल्या अभ्यासक्रमासाठी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क, ई-सुविधा शुल्क तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे.

वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत -

| | | |
|---|---|---|
| १. | प्रतिवर्षीप्रमाणे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचे नियमित वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणेची अंतिम तारीख (निरंतर संलग्नीकरण मिळाले असले तरी वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणे आवश्यक आहे.) लेखाशिर्षक - A-२-R-१ | दि.३१ जुलै, २०२३ पर्यंत. |
| २. | विलंब शुल्कासह वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरण्याची तारीख -<br>१. विहित शुल्क + विहित शुल्काच्या १० % विलंब शुल्क | दि. ३१ ऑगस्ट, २०२३ पर्यंत. |
| | २. विहित शुल्क + विहित शुल्काच्या २० % विलंब शुल्क | दि. ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत. |
| | ३. विहित शुल्क + विहित शुल्काच्या २५ % विलंब शुल्क | दि. ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत. |
| ३. | उपरोक्त तारखांपर्यंत जी महाविद्यालये वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणार नाहीत ती महाविद्यालये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार योग्य त्या कारवाईस पात्र समजण्यात येतील. | |
| ४ | महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थेस स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतरही वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणे आवश्यक आहे. तथापि, सदरचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क प्रतिवर्षी न भरता दोन वर्षाचे एकरकमी शुल्क भरणे आवश्यक आहे. | |
| ५. | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क स्वतंत्र भरणे आवश्यक आहे. | |
| ६. | संदर्भ क्र.:संलग्नता/टी-२/६८१, दि.३० सप्टेंबर, २०२१ च्या परिपत्रकामध्ये निर्धारित केल्यानुसार वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरावे. सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Affiliation ⟶ Affiliation T-२ Circulars या लिंकवर उपलब्ध आहे. | |
| ७. | शासन निर्णय क्रमांक ई सेवा २००६/(१९१/०६)/मशि-१, दि.१९ जून,२००६ नुसार प्रती विद्यार्थी रू.५०/- प्रमाणे प्रतिवर्षी ई-सेवाशुल्क भरणे आवश्यक आहे. सदरचा शासन निर्णय विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Affiliation⟶ AffiliationT२ Circulars या लिंकवर उपलब्ध आहे.(लेखा शिर्षक- E-४-R-११) (**महाविद्यालयांनी ई-सेवाशुल्क संगणक विभागाकडे जमा करावे** ) | |
| ८. | विद्यापीठ परिनियम ५९० नुसार पारंपारिक पदव्युत्तर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी शुल्क विहीत केल्यानुसार भरणे आवश्यक आहे. (लेखा शिर्षक - A-२-R-२) | |
| ९. | सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था तसेच संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधील विद्याशाखा/अभ्यासक्रम/ विषय/तुकडी बंद करण्याबाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १२१ नुसार विद्यापीठाकडे दि.०१ ऑगस्ट,२०२३ किंवा त्यापूर्वी आवश्यक त्या कागदपत्रांसह विहीत शुल्क भरून By Post सादर करणे आवश्यक आहे. तदनंतर आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. | |
| १०. | जी अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल विद्यापीठाशी (बाटू) संलग्न झाली आहेत, त्या महाविद्यालयांनी तसेच स्वायत्त विद्यापीठ म्हणून दर्जा प्राप्त केलेल्या महाविद्यालयानेसुध्दा सदर महाविद्यालयांचे काही वर्षांचे अभ्यासक्रम अद्यापि शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असल्याने सदर अभ्यासक्रमांचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क विहीत मुदतीत भरणे आवश्यक आहे. | |
| ११. | **महाविद्यालयांनी उपरोक्त मुद्दा क्र. ६ मध्ये नमुद केले नुसार महाविद्यालयांमध्ये सुरू असणाऱ्या अभ्यासक्रमांचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क विद्यापीठाच्या संकेतस्थळावरती Quick Link मेनूमधील Online Payment Gate Way या Link मधून General Receipt या Drop down menu मध्ये नोंदणी करून User id व Password तयार करून शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. विहीत मुदतीनंतर Online शुल्क भरल्यास विलंब शुल्क आकारण्यात येईल याची कृपया नोंद घेणेत यावी. तसेच सदर बाबत काही अडचणी उदभवल्यास विद्यापीठाशी संपर्क साधावा.** | |

कळावे.

आपला विश्वासू,

(श्री विलास एस. सोयम)
उपकुलसचिव

संदर्भ क्र. : संलग्नता/टी-२/ No 7 18
दि. 15 JUL 2023
प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रत :- १) पात्रता विभाग २) नगदी विभाग